कै. श्री. नरवणे गोरख उध्दवराव, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) यांचे विरुध्द सुरु असलेल्या शिस्तभंग विषयक करवाईबाबत अंतिम निर्णय घेणे बाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-३/१०६६२३८/१०८५/२०२५
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. इकडील निलंबन आदेश क्र.साप्रवि/आस्था-३/५३२३/१५८०/२०२३ दि १३/१२/२०२३
२. इकडील दोषारोप पत्र क्र.साप्रवि/आस्था-३/५३२३/१५८१/२०२३ दि १३/१२/२०२३
३. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती जामखेड यांचेकडील पत्र क्र.आस्था-१/२८१/२०२३ दिनांक ०७/०६/२०२४
४. इकडील आदेश क्र.साप्रवि/आस्था-३/५३२३/१६२/२०२५ दिनांक ०६/०२/२०२५
५. इकडील पुनस्थापित आदेश क्र.साप्रवि/आस्था-३/५३२३/१६३/२०२५ दि ०६/०२/२०२५
६. सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र जा.क्र.विशा४/खाचौ/ सी.आर./१८/२०२५ दिनांक ३१/०७/२०२५
७. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव यांचेकडील पत्र जा.क्र.साप्रवि/आस्था-१ २२२८/२०२५ दिनांक ०६/१०/२०२५
८. ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील परिपत्रक क्र डिईएन-१००६/प्र.क्र.५६४/आ.१२ दिनांक ०४ जुलै २००६
९. म.ना.से (पदग्रहन अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी वे सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ७२ (२)

कै. श्री. नरवणे गोरख उध्दवराव, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) हे गट शिक्षण कार्यालय, पंचायत समिती जामखेड येथे कार्यरत असताना अनाधिकृत गैरहजर रहाणे, कार्यालयीन कामकाजात हलगर्जिपणा करणे, वरिष्ठांच्या आदेशाचे अवमान करणे अशाप्रकारचे गैरवर्तन केल्याने संदर्भ क्र. १ अन्वये कै.श्री. नरवणे यांना सेवानिलंबीत करणेत आलेले आहे. संदर्भ क्र.२ अन्वयेचे ज्ञापन दोषारोप कै.श्री.नरवणे यांना संदर्भ क्र. ३ अन्वये बजाविण्यात आले होते. सदर ज्ञापन दोषारोप पत्रामध्ये त्यांचेवर ठेवण्यात आलेले आरोपाबाबत कै.श्री.नरवणे यांनी खुलासा सादर केलेला नसलेने प्रकरणी चौकशी होणेकामी सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांची नियुक्ती करणेत आली. संदर्भ क्रमांक ६ नुसार विभागीय चौकशी पुर्ण होऊन चौकशी अहवाल प्राप्त झाला. सदरचे चौकशी अहवालात कै. श्री नरवणे गोरख उध्दवराव, कनिष्ठ सहाय्यक यांचेवरील ०४ दोषारोप सिध्द होत असले बाबतचे निष्कर्ष प्राप्त झालेले आहेत.

गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव यांचेकडील संदर्भ क्रमांक ७ नुसार कै. श्री नरवणे गोरख उध्दवराव, कनिष्ठ सहाय्यक हे दिनांक २६/०८/२०२५ रोजी मयत झाले असले बाबत कळविणेत आलेले आहे.

ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील दिनांक ०४ जुलै २००६ रोजीच्या परिपत्रकानुसार शिस्तभंग विषयक कारवाई प्रलंबित असताना जिल्हा परिषद कर्मचा-याचा मृत्यु झाल्यास शिस्तभंगविषयक कारवाई तात्काळ संपुष्टात आणणेची तरतुद आहे. सबब शासन परिपत्रकामधील तरतुदीनुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर कै. श्री. नरवणे गोरख उध्दवराव, कनिष्ठ सहाय्यक यांचे विरुध्द संदर्भ क्रमांक २ नुसार सुरु असलेली शिस्तभंगविषयक कारवाई या आदेशान्वये बंद करीत आहे.

तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टकाणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ७२ (२) नुसार जर निलंबित शासकीय कर्मचारी, त्याच्या विरुध्द सुरु करण्यात आलेली शिस्तभंगाची किंवा न्यायालयीन कारवाई समाप्त होण्यापुर्वी मरण पावला तर, निलंबनाचा कालावधी हा सर्व प्रयोजनार्थ, कामावर व्यतीत केलेला कालावधी म्हणुन मानण्यात येईल अशी तरतुद आहे. त्यामुळे कै. श्री. नरवणे गारेख उध्दवराव, कनिष्ठ सहाय्यक यांचा दिनांक १३/१२/२०२३ ते दिनांक १३/०२/२०२५ अखेरचा निलंबन कालावधी हा सर्व प्रयोजनार्थ कामावर व्यतीत केलेला कालावधी म्हणुन धरणेत येत आहे. कै. श्री. नरवणे गारेख उध्दवराव, कनिष्ठ सहाय्यक यांना निलंबन कालावधीत जेवढे वेतन व भत्ते मिळण्याचा हक्क त्यांना असता तेवढे पुर्ण वेतन व भत्ते त्यांच्या कुटुंबाला देण्यात येतील. मात्र कै. श्री.नरवणे गारेख उध्दवराव, कनिष्ठ सहाय्यक यांना निलंबन कालावधीत देण्यात आलेली निर्वाह भत्याची रक्कम त्यातुन समायोजित करण्याचे आदेश देण्यात येत आहे.

सदर आदेशाची नोंद कै. श्री. नरवणे गारेख उध्दवराव, कनिष्ठ सहाय्यक, यांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक 20251021040182 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 21-10-2025 14:17:50
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

**वैद्यकिय अधिकारी, प्रा.आ.केंद्र दहिगाव बोलका ता कोपरगाव**

२/- सदरचा आदेश कै. श्री नरवणे गारेख उध्दवराव, कनिष्ठ सहाय्यक यांचे वारस पत्नी यांना बजावणेत येऊन त्यांची दिनांकीत पोहोच या कार्यालयास सादर करावी. तसेच त्यांचे कुटुंब निवृत्ती वेतनाबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी.

स्वाक्षरी/--
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर